# सर्वोदयपात्र कां व कसें

९५५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ९२९६




REFBK-0009803

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

REFBK-0009803
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
दा. क्र. ८०३ अनुक्रम २८७२ वि: ।८।८।५१
क्रमांक ९३६६ नों: दि: १५।२।५१

# सर्वोदयपात्र कां व कसें

## जुन्या झाडावर नवीन कलम

सर्वोदय-पात्राची कल्पना तसें पाहिल्यास अगदीं नवी किंवा बिनबुडाची नाहीं. जुन्या झाडावर नवीन कलम करावें तशी ही योजना आहे.

आपल्या येथें पूर्वींपासून अशी एक रूढि चालत आली आहे कीं जेवणापूर्वी थोडा भाग काढून ठेवायचा. आज वैश्वदेव किंवा गो-ग्रास एवढें च त्याचें प्रतीकात्मक स्वरूप शिल्लक राहिलें आहे. धर्म जेव्हां सर्वांगपूर्ण असतो तेव्हां तो जीवनांत मुरलेला असतो. परंतु तो विकलांग झाला कीं नांवापुरता उरतो आणि प्रतीकात्मक बनतो. तशी आज स्थिति झाली आहे.

म्हणून सर्वोदय-पात्राची कल्पना मीं मांडली तेव्हां स्वाभाविक च मधुकरी आणि गो-ग्रास यांचें मंडळींना स्मरण झालें. धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांना यामुळें च या कामांत गोडी वाटते. अशा रीतीनें या सर्वोदय-पात्राला आधार जरी जुना असला तरी त्याचा उद्देश मात्र अगदीं वेगळा आणि नवा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

## शांति-सैनिकांची गरज

ग्रामदान कशासाठीं ? ग्रामस्वराज्यासाठीं. पण ग्रामस्वराज्याच्या रक्षणाची व्यवस्था काय ? अहिंसक समाज-रचनेंत पोलीस आणि मिलिटरी यांचा आधार चालेल कां ? नाहीं चालणार. त्यासाठीं शांतिसैनिकाची गरज लागेल. असे सैनिक किती पाहिजेत ? मीं असा अंदाज केला आहे कीं

५ हजार लोकसंख्येमागें १ सेवक असला पाहिजे. या हिशोबानें ३६-३७ कोटी लोकसंख्येसाठीं जवळपास ७५ हजार सेवा-सैनिक साऱ्या भारतांत उभे व्हायला हवेत.

हल्लीच्या काळीं लोक सरकारकडून फार अपेक्षा करतात. परंतु ज्या प्रमाणांत अपेक्षा राखली जाते त्या प्रमाणांत ती पुरी होत नाहीं. मग आशेच्या जागीं निराशा येऊं लागते. जनतेमधून आशा नाहींशी होऊन तिच्या मनांत निराशेनें घर केलें तर तिच्याकडून कसला च पुरुषार्थ होऊं शकत नाहीं. स्वराज्यांत लोकांना आपलें जीवन व्यर्थ आणि विफल आहे असें वाटूं लागलें तर तें फार मोठें संकट आहे असें जाणते पुरुष ओळखतात. असें संकट स्वराज्यावर येतां कामा नये. स्वराज्य आशामय बनलें पाहिजे.

आमचें राज्य हें आमच्या गांवाचें राज्य आहे असें प्रत्येकाला वाटलें पाहिजे आणि आमचें रक्षण आम्ही च करूं आसा आत्मविश्वास लोकांमध्यें उत्पन्न झाला पाहिजे. प्रत्येक काम लोकशक्तीनें व्हावें, प्रत्येक गांवाची गरज मुख्यतः लोकशक्तीनें च पुरी व्हावी, त्यासाठीं लोकांनीं परिश्रम करावे आणि सरकारनें लोकांना मदत करावी असें झालें पाहिजे. प्रत्येक गांवांत गांवाची सेवा करणारा कोणी तरी सेवक असला पाहिजे कीं नाहीं ? "गृहिणी गृह-मुच्यते" ज्या घरांत सेवा करणारी माता नाहीं तें घर कसलें ? तसें ज्या गांवांत ग्रामसेवक नाहीं तें गांव कसलें ?

## शांति-सैनिक काय करील ?

म्हणून प्रत्येक गांवांत एक सर्वोदय-सेवक असला पाहिजे. त्याला कोणता हि पक्ष असणार नाहीं, कोणती जाति असणार नाहीं, कोणता हि पंथ असणार नाहीं. सर्वांची मनुष्य या नात्यानें सेवा करणें हाच त्याचा धर्म आणि हाच त्याचा पंथ. ग्रामसेवक पक्षपात करणार नाहीं; सर्व राजकीय वादापासून तो मुक्त राहील; प्रेम, करुणा आणि तळमळ त्याच्या चित्तांत भरून राहिलेली असेल; तो आळशी असणार नाहीं. गांवांत कोणी आजारी असला

तर तो त्याच्या सेवेला हजर. शेतांत कोणाला मदत हवी असेल तर त्याच्या मदतीला तो हजर. जिथें जिथें मदतीची आणि सेवेची गरज पडेल तिथें तो जाईल. परंतु तो पैशाची मदत देणार नाहीं. कारण त्याच्यापाशीं पैसा च असणार नाहीं. ज्या सेवेमधें शरीराला कष्ट होतात तीच सेवा सर्वांत श्रेष्ठ होय.

आपण या ग्रामसेवकाचें नांव च बदलून टाकूं. त्याला तुकाराम म्हणूं या. प्रत्येक गांव हें देहू गांव आणि प्रत्येक सेवक हा तुकाराम !! तो कधीं लोकांना वाचून दाखवील, कधीं हातांत झाडू घेऊन गांवची सफाई करील, कधीं कोणाच्या शेतांत मदतीला जाईल, कधीं आजाऱ्याची सेवा करील. जगांत काय चाललें आहे त्याची माहिती सांगेल, 'भूदान' साप्ताहिक आणि सर्वोदय-साहित्य वाचून दाखवील. प्रत्येक आठवड्याला गांवची सभा भरवील आणि गांवांतील लोकांच्या कानावर ज्ञान घालीत राहील. अशा रीतीनें तो नित्य सेवा करीत जाईल. वाचेचा रसाळ, अंतरीं निर्मळ, आणि पायाचा शाबूत, असा तो सेवक असेल. अशासारखी योजना ज्या गांवीं असेल तें गांव देहू कां बनणार नाहीं ?

### सेवकांचें संमेलन

गांवाची चिंता करणारा आणि गांवासाठीं आत्मसमर्पण केलेला सेवक प्रत्येक गावाला असला पाहिजे. दर पंधरा दिवसांनीं जवळपासचे कांहीं सेवक एकत्र जमतील, आपापल्या गांवची परिस्थिति आणि अडचणी यांवर विचारविनिमय करतील. एकादशीचा दिवस ग्रामचर्चेचा असावा. कधीं या गांवांत तर कधीं त्या गांवांत सेवक जमतील. प्रेमानें चर्चा करतील आणि पुन: सेवेसाठीं आपापल्या गांवीं परत जातील. अशा तऱ्हेची एक सुंदर योजना माझ्या मनांत आहे.

### शांति-सैनिकांच्या पोषणाची स्वल्प खर्चीक योजना

निधि-मुक्तीनंतर आपले कार्यकर्ते अगदीं भिंतीशीं टक्कर देऊन राहिले आहेत. त्यांची संख्या फार नाहीं. साऱ्या भारतांत हजार-दोन

हजार असेल. परंतु शांतिसेनेसाठीं तर पाऊण-एक लाख लोकांची मी मागणी करीत आहें. यांच्या निर्वाहाची योजना काय ? कोणत्या हि पोलीस-संघटनेला किंवा लश्कराला शांतिसेनेइतका कमी खर्च येणार नाहीं. कारण एक लाख सैनिकांच्या द्वारे सबंध भारताची शांति, आणि ती हि मूठभर धान्याच्या आधारें!! तें मूठभर धान्य देखील भारताच्या २५ टक्के घरांतून मिळालें तरी पुरे. इतका हा नगण्य खर्च आहे. आज जगांतील सर्व देशांतून मिलिटरीवर होणाऱ्या खर्चाचे आंकडे पाहिले तर ज्योतिष-शास्त्राच्या आंकड्यांची च आठवण होते. त्या मानानें शांतिसेनेचा खर्च किती अल्प! परंतु या योजनेंत क्रांतिबीज आहे, अभय-बीज आहे. सामूहिक प्रयत्न झाला तर च यांतील नारायणी-शक्ति प्रगट होईल.

## सर्वोदय-पात्राचा उद्देश

गेल्या ७-८ महिन्यांपासून या विषयाचें माझें चिंतन चालू आहे. आज भारतांत च केवळ नव्हे तर साऱ्या जगांत शांति कशी नांदेल हा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा होऊन बसला आहे. जगांतील सज्जन आणि विचारवंत लोकांच्या मनांत अशांतीविरुद्ध क्षोभ निर्माण झाला असला तरी 'महाजनांच्या' मनांत असा क्षोभ निर्माण झाल्याशिवाय शांति नांदणार नाहीं. ज्यांच्या हातीं सत्ता आहे त्यांना 'महाजन' म्हटलें जातें. मतदानाच्या मार्गानें या लोकांच्या हातीं जनता च सत्ता सोंपवीत असते. त्यामुळें या सरकारांना लोक-संमति मिळालेली च आहे असें मानलें जातें.

परंतु सर्वोदय-पात्राच्या द्वारें देशांत अहिंसेच्या मार्गानें शांति-स्थापना करण्याच्या कामीं आपल्याला लोकसंमति मिळवायची आहे. समाजाची घडी कायम राखून च आम्हांला समाजाची सेवा करायची असती तर लोक-संमतीची आम्हांला गरज नव्हती. परंतु आपण समाज-रचना बदलूं इच्छितों. ही समाजरचना बदलतांना समाजाला त्यांत कांहीं तकलीफ सहन करावी लागणार आहे. ती तकलीफ सहन करण्याची तयारी असल्याबद्दलची

संमति लोकांकडून मिळण्याची गरज आहे. सर्वोदय-पात्राच्या रूपानें ही लोक-संमति आपल्याला मिळवायची आहे.

अहिंसक समाज-रचनेला संमति देतांना स्वतः त्या दिशेनें पाऊल टाकण्याचा हि संकेत सर्वोदय-पात्रांत आहे. म्हणजे ज्या ज्या घरांत सर्वोदयपात्र ठेवलें जाईल त्या घरांतील कोणी हि व्यक्ति हुल्लडबाजींत भाग घेणार नाहीं किंवा दगडफेंक करणार नाहीं अशी प्रतिज्ञा सर्वोदयपात्रांत गृहीत आहे.

लहान बालकाच्या हातून मूठभर धान्य त्या पात्रांत टाकायचें असल्या-मुळें बालकाला लहानपणापासून च अशांतीच्या आणि हिंसेच्या कृत्यांत भाग न घेण्याचें शिक्षण मिळावें हा सर्वोदय पात्रांतील दुसरा महत्त्वाचा उद्देश आहे.

प्रत्यक्ष शांति-स्थापना करणारी शांतिसेना देशांत उभी झाली पाहिजे. जनतेची प्रत्यक्ष सेवा हें च या सेनेचें शस्त्र. जनतेची सेवा करणारी व्यक्ति च जनतेच्या विश्वासाला आणि आदराला पात्र होईल. म्हणून शांतिसेना ही नित्याची सेवा-सेना म्हणून च काम करील. अशा शांतिसैनिकांच्या योग-क्षेमाची काळजी करणें जनतेचें कर्तव्य आहे. सर्वोदयपात्रांतील धान्यांतून अशा शांतिसैनिकांचा निर्वाह चालावा हा हि एक उद्देश सर्वोदयपात्रा मागें आहे.

## शांति-सैनिकांचा निर्वाह

आपण आंब्याचें झाड लावतों तें आंबे मिळावेत म्हणून लावीत असलों तरी त्या झाडापासून छाया, सुगंध, आणि इंधन हीं आनुषंगिक फळें हि आपल्याला मिळतात. त्याप्रमाणें लोक-संमति हा सर्वोदयपात्राचा मुख्य उद्देश असला तरी शांतिसैनिकाचा निर्वाह हें सर्वोदय पात्राचें आनुषंगिक फळ आहे. शांति-सैनिकाचा निर्वाह सर्वोदयपात्राहून अन्य मार्गानें करणें कमी शोभास्पद आहे आणि पात्रांतून तो करणें अधिक शोभास्पद आहे.

## सर्वोदय-पात्र कसें ठेवायचें

या शांतिसैनिकांच्या योगक्षेमासाठीं मीं एक फारच सुंदर योजना काढली आहे. प्रत्येक घरीं सर्वोदय-पात्र ठेवलें जावें. द्रौपदीला सूर्यानें एक अक्षयपात्र दिलें होतें अशी कहाणी महाभारतांत आहे. त्या अक्षय पात्रांत रोजच्या पुरतें च अन्न मिळे. तसें हें सर्वोदय-पात्र घरोघर रहायचें. त्यामधें नित्य नियमानें रोज एक मूठभर धान्य घरांतील लहान बालकाच्या हातून टाकायचें. तें धान्य उंदीर खाणार नाहीं किंवा तें हवेनें खराब होणार नाहीं अशी काळजी घ्यायची. महिनाभर अशा रीतीनें जमा झालेलें धान्य ठरलेल्या ठिकाणीं नियमित नेऊन पोंचवायचें. एखाद्या संस्थेमार्फत किंवा व्यापाऱ्यामार्फत त्या धान्यापैकीं काहींचें पैशांत हि रूपांतर करावें लागेल. सगळें धान्य खाण्याच्या च कामीं खर्च केलें पाहिजे असें नव्हे. शिवाय धान्याचा संग्रह करून त्याला कीड थोडीच लागूं द्यायची आहे ?

## बालकाला सत्-संस्कार

लहान बालकानें सर्वोदयपात्रांत रोज एक मूठ टाकायची यांत त्या बालकाचें केवढें शिक्षण होइल !! सर्वोदय-विचाराच्या प्रसारासाठीं, शांति-स्थापनेसाठीं, आणि समाज-पुरुषाचें ऋण अल्पांशानें फेडण्यासाठीं, दररोज जेवणापूर्वीं एक मूठ पात्रांत टाकण्यानें त्याच्या मनावर केवढा शुभ संस्कार उमटेल ! तो यामुळें चारित्र्यवान, निष्ठावान, आणि करुणासंपन्न निपजेल अशी माझी खात्री आहे. बालकाला रोज मूठभर धान्य सर्वोदयपात्रांत टाकण्याचें एकदां वळण लागलें कीं ती गोष्ट केल्याशिवाय तो जेवणार नाहीं. कारण बालक परमेश्वराच्या जवळ असतो ना ?

## मूठभर धान्यांतून जगभर शांति

प्रत्येकानें सर्वोदयपात्रांत मूठभर धान्य नियमित टाकायचें, तें शाबूत स्थितींत ठरलेल्या मुक्कामावर पोंचवायचें, त्याच्या आधारानें शांतिसेना बनायची, आणि सेवा-कार्य ठिकठिकाणीं चालू व्हायचें, त्या शांति-सैनिकांची सेवा

लोकांना मानवायची, आणि लोकांच्या हातून पराक्रमाचीं कामें पार पडायचीं, त्याचा परिणाम देशावर होऊन पोलिसांची गरज उरायची नाहीं, या गोष्टीचा परिणाम मध्यवर्ती सरकारवर व्हायचा, मग देशांत सेनेची गरज रहायची नाहीं, याचा परिणाम जगावर होऊन जगांत सर्वोदय-राज्य कसें स्थापित होऊं शकतें याचें दर्शन सर्वांना व्हायचें, मग सर्व जगांत अहिंसक शक्ति बलवान् व्हायच्या, आणि शेंवटीं जगांत शांति स्थापन व्हायची ! अशा रीतीनें या मूठभर धान्यांतून जगभर शांतीची आकांक्षा बाळगली आहे.

## म्हटलें तर अशक्य, म्हटलें तर सोपा असा कार्यक्रम

मूठभर धान्यांतून केवढी मोठी हीं अपेक्षा ! रामनाम सोपें आहे असें सांगतात. जन्मभर रामनामाचा जप न करतां केवळ अंतकाळीं रामनाम आठवलें तरी मोक्ष मिळतो असें म्हणतात. परंतु तें इतकें सोपें असून हि लाखो लोक रामनाम घेऊन मोक्षाकडे जातांना दिसतात कां ? मोक्ष ही सर्वांत मोठी वस्तु आणि रामनाम सर्वांत सोपें. सर्वांत सोप्या साधनानें सर्वांत मोठी वस्तु गाठायची जशी ही योजना, तसें च मीं केलें आहे. मूठभर धान्यानें साऱ्या भारतांत च नव्हे तर जगांत शांति स्थापन व्हायची ! परंतु इतक्या अव्यवहारी योजनेला हि भारतांतले लोक व्यवहारी समजून तिच्याकडे आशेच्या नजरेनें पाहतात हें भारताचें विलक्षण नशीब आहे !!

## राष्ट्रपतींच्या घरीं सर्वोदयपात्र

आपले पूजनीय राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या घरीं सर्वोदयपात्र ठेवलें गेलें आहे. त्यांनीं आशीर्वाद देऊन आशा प्रगट केली आहे कीं " हिंदुस्थानांतील घराघरांतून असें सर्वोयदपात्र ठेवलें जावें." एवढी मोठी सत्त हातीं असलेल्या आपल्या पूजनीय नेत्यानें आपल्या घरांत सर्वोदयपात्र ठेवल्याचें वाचून मी तर विरघळून गेलों. माझ्या चित्तावर त्याचा जो परिणाम झाला तो शब्दांत व्यक्त करणें शक्य नाहीं.

### ठिणगी पेटायला हवी

हें इतकें अशक्यप्राय कार्य ईश्वरानें उचललें तर च होईल, परंतु मला सारखें वाटतें कीं हें काम कुठें तरी करून दाखवायला हवें. एखाद्या क्षेत्रांत तरी ठिणगी पेटायला हवी.

### स्त्री-शक्तीला लाभलेलें सेवा-क्षेत्र

रथाला दोन चाकें असतात तसें समाजरूपी रथाला स्त्री आणि पुरुष हीं दोन चाकें आहेत. सर्वोदयपात्र हें मुख्यतः स्त्रियांचें काम आहे. त्या आपलें घर सांभाळून आपल्या मोहल्ल्यांतील घराघरांत जाऊन प्रचार करूं शकतात आणि सर्वोदयपात्रें ठेवण्याबद्दल मातांना प्रेरित करूं शकतात. भूमिदान भूमिवानासाठीं, संपत्तिदान संपत्तिवानासाठीं, परंतु प्रत्येक घरांतून करण्यासारखें सेवा-कार्य कोणतें ? सर्वोदयपात्र. माता आणि बालक यांच्या द्वारें सर्वोदय-विचार आतां थेट स्वयंपाकघरापर्यंत पोचला आहे.

# पू. विनोबांचें पत्र :
## (वर्धा जिल्ह्यासाठीं विनोबांचा संदेश)

वर्धा जिल्हावासी बंधुभगिनींनो,

सबंध हिंदुस्थानभर शांति-सेना आणि त्यासाठीं लोक-संमति हा विचार एखाद वर्षापासून देशापुढें मी मांडीत आहें. आजच्या स्थितींत हा केवळ विचार न राहतां याचा कार्यक्रम बनण्याची गरज सर्वांना च पटली आहे. सर्व-सेवा-संघानें या संबंधी ठराव च केल्यामुळें सगळीकडे त्यासंबंधीं हालचाली होतील अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

शांति-सेना ही नित्याची सेवा-सेना. आणि नैमित्तिक प्रसंगीं ही च शांति-सेना असें तिचें दुहेरी रूप राहील. अर्थात् पक्ष-भेद, पंथ-भेद, जाति-भेदे, धर्म-भेद, वर्ग-भेद इत्यादि सर्व संकुचित कल्पनांपासून मुक्त असलेल्या सत्य, प्रेम आणि करुणा यांच्यावर दृष्टि स्थिर करून चालण्याचा प्रयत्न करणाऱ्या सेवकांची ती सेना असेल. असे सेवक लोकांनीं पुरवायचे आहेत. त्यासाठीं आपल्या सक्रिय संमतीची खूण म्हणून घरोघर सर्वोदय-पात्र ठेवायचें आहे. आणि 'विश्व-मानुषा'च्या उपासनेचें मुलांना वळण लावण्यासाठीं मुलांकडून त्या पात्रांत रोज नियमितपणें मूठभर धान्य टाकावयाचें आहे.

योजना भारत-व्यापी आहे. स्वाभाविक च माझी अशी अपेक्षा आहे कीं वर्धा-जिल्हावासी भारताला धडा घालून देतील. वर्धा-जिल्ह्यांतील यच्चयावत् सर्व घरांत सर्वोदय-पात्र विराजमान व्हावयास पाहिजे.

पहिलें पाऊल म्हणून आरंभाला निदान पंचवीस हजार सर्वोदय-पात्रें वर्धा-जिल्ह्यांत लवकरांत लवकर बनवींत अशी माझी अपेक्षा आहे. माझी अशी खात्री आहे कीं सर्व लोक उत्साहानें हा कार्यक्रम उचलून धरतील आणि वर्धा जिल्हा, सर्वोदय-जिल्हा असल्याचें सिद्ध करतील.

कापडणें

१६-८-'५८

विनोबाचा जय जगत

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. e C03
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 2172 ...... वि: निबंध
क्रमांक 7256 ...... नों: दि: 25/1/64

# शंका समाधान

**प्रश्न :** सर्वोदय-पात्रांत रोजच्या रोज मूठ टाकली पाहिजे म्हणतां, परंतु महिन्याभराचें किंवा वर्षाचें धान्य एकदम देऊन टाकलें तर चालणार नाहीं कां ?

**उत्तर :** नाहीं चालणार. पात्रांत रोज नियमितपणें मूठ टाकण्याचें महत्त्व वेगळें च आहे. रामनामाचा जप रोज करायचा असतो. शंकरावर अभिषेक थेंबाथेंबानें करायचा असतो. हंडाभर पाणी एकदम ओतून चालत नाहीं. त्या प्रमाणें सर्वोदय-विचाराचा जप आणि स्मरण प्रतिदिनीं उपासनेसारखें बालकाला झालें पाहिजे.

स्नान केल्यानें शरीर शुद्ध होतें. पण स्नानाबरोबर पुरुषसूक्ताचे मंत्र म्हटले तर मन हि शुद्ध होतें. तसें मूठभर धान्याबरोबर बालकाचें शिक्षण हि यांत होतें. म्हणून सर्वोदय-पात्र ठेवण्याचें एखाद्यानें कबूल केलें एवढें पुरेसें नाहीं. घरामधें सर्वोदय-पात्र ठेवलेलें आहे कीं नाहीं आणि लहान बालक रोज उपासनापूर्वक त्या पात्रांत मूठ टाकतो आहे कीं नाहीं हें कार्यकर्त्यांनें पाहिलें पाहिजे.

सर्वोदय-पात्र ही वर्गणी, फंड, किंवा भिक्षा नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ती एक उपासना आहे, सर्वोदय-विचाराचें तें अनुसंधान आहे, स्वतः खाण्यापूर्वीं समाज-पुरुषाला अर्पण करण्याचा तो हविर्भाग आहे. म्हणून तें काम नित्य नेमानें आणि धार्मिक भावनेनें झालें पाहिजे.

**प्रश्न :** लहान बालकाच्या च हातची मूठ असली पाहिजे असा आग्रह कां ? बालकाच्या मुठींत कितीसें धान्य मावणार ?

**उत्तर :** धान्य गोळा करणें एवढा च पात्राचा हेतु नसून संस्कारांची आणि विचाराची दीक्षा देणें हा मुख्य उद्देश आहे. अशा संस्कारासाठीं कुटुंबांतील बालक हेंच सर्वोत्तम वाहन आहे.

सर्वोदय-पात्र गरिबाच्या घरचें असो कीं श्रीमंताच्या घरचें असो लहान बालकाची च मूठ त्यांत पडावी. कारण बालक परमेश्वराच्या अगदीं जवळ असतो. त्याच्या चित्ताला भेदाभेद, विषमता, श्रीमंती-गरिबी, यांचा स्पर्श नसतो.

कोणावर हि फारसा भार पडूं नये म्हणून अल्पांत अल्प स्वीकारणें हा हि बालकाच्या मुठींतला हेतु आहे. परंतु कुटुंबांत बालक नसेल तर घरांतील लहान वयाच्या इसमानें मूठ टाकावी.

**प्रश्न :** सर्वोदय-पात्रांतील धान्य दर महिन्याला कोण घेऊन जाईल ?

**उत्तर :** वास्तविक पात्र ठेवणारानें च स्वतः तें धान्य ठरलेल्या ठिकाणीं आठवणीनें पोंचविलें पाहिजे अशी अपेक्षा आहे. परंतु यासाठीं ‘ सर्वोदय-मित्र ’ तयार करण्याची कल्पना आहे. ज्या मंडळींनीं आपल्या घरीं पात्र ठेवलें असेल त्यांच्यांतून च पंचवीस पात्रांची व्यवस्था पाहणारा एक सर्वोदय-मित्र आपण निवडावा. तो दर महिन्यास त्या पंचवीस घरांतून जाऊन धान्य पोंचतें झालें आहे कीं नाहीं हें पाहील, आणि नसेल झालें तर घेऊन जाऊन ‘ महापात्रांत ’ टकील.

**प्रश्न :** हें ‘ महापात्र ’ काय आहे ?

**उत्तर :** घराघरांतून जें सर्वोदय-पात्र ठेवलें जाईल तें पात्र. आणि मोहल्ल्यांतील धान्य एके ठिकाणीं ज्या पात्रांत जमा केलें जाईल तें ‘ महा-पात्र ’. मातीचा रांजण अथवा पत्र्याचे मोठे ड्रम तयार करावेत. गहूं

ज्वारी, आणि तांदूळ, अशा धान्यासाठीं वेगवेगळें डबे असावेत. त्यांवर 'सर्वोदय-महापात्र' अशीं अक्षरें रंगवून धान्याचें नांव लिहावें. त्या डब्याला सील असावें. धान्य टाकण्यासाठीं वरून पिठाच्या चक्कीला चाडी असते तशी चाडी ठेवावी.

**प्रश्न :** या एकत्रित धान्याचें पुढें काय होणार ?

**उत्तर :** अशा रीतीनें गांवांतील ठिकठिकाणच्या 'महा-पात्रां' तील धान्य एकत्र करून गांवांतील चार व्यापाऱ्यांमार्फत त्याचा जाहीरपणें भाव लावून तें धान्य गांवांत च विकून टाकण्यांत येईल आणि त्याची रकम जिल्ह्याच्या सर्वोदय-कार्यालयांत जमा करण्यांत येईल.

**प्रश्न :** धान्य विकून पैसा करण्यांत धान्य टाकण्यामागील भावना नष्ट होत नाहीं कां ?

**उत्तर :** शांति-सैनिकाच्या पोषणासाठीं हें धान्य धान्याच्या स्वरूपांत च पोंचतें होऊं शकलें तर अर्थात च उत्तम योजना होईल. परंतु धान्य ही खराब होणारी आणि कीड लागणारी वस्तु आहे. म्हणून त्याचा संग्रह होऊं न देतां लवकरांत लवकर तें उपयोगांत आणलें गेलें पाहिजे.

शिवाय धान्याची ने-आण करण्यांत व्यर्थ शक्ति पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होईल.

धान्य विकून टाकल्यानें गांवांतील धान्य गावांत च राहील.

**प्रश्न :** धान्य जर विकून च टाकायचें आहे तर मग पैसा च कां टाकूं नये ?

**उत्तर :** मूठभर धान्यांत जी भावना आहे ती पैशांत नाहीं. आपल्या नित्याच्या आहारांतील वस्तु पात्रांत अर्पण करायची आहे. ती धान्य च असूं शकते.

परंतु धान्याऐवजीं पैसा टाकण्याचा पर्याय हि, गौण असला तरी, चालेल. हा पैसा लहानांतला लहान म्हणजे नया पैसा असला पाहिजे. रोज एक नया पैसा मुलानें पात्रांत टाकला तरी चालेल.

**प्रश्न:** घराघरांतून गोळा होणारें धान्य नीट व्यवस्थितपणें आणि नेमकें कार्यालयांत पोंचलें कीं नाहीं हें पाहिलें न गेलें तर अनेक गैर प्रकार यांतून उत्पन्न होतील. त्यासाठीं काय योजना आहे?

**उत्तर:** सर्वोय-पात्रामागील भावना लक्षांत घेतली तर अशी शंका वास्तविक उपस्थित होऊं नये. हें काम सद्भावनेवर आणि विश्वासावर च चालायचें. परंतु अप्रामाणिकपणाला अवकाश राहूं नये म्हणून पात्रांतील धान्य अथवा पैसा पोंचल्याची पावती सर्वोदय-मित्रानें घरवाल्यास देण्याची पद्धति ठेवलेली बरी. अमुक एक सर्वोदय-मित्र ही अधिकृत व्यक्ति आहे हें हि सर्वोदय-कार्यालयातर्फे त्या त्या संबंधित पात्रवाल्यांना कळविण्यांत यावें.

**प्रश्न:** प्रत्येक घरांतून नियमितपणें सतत धान्य टाकलें जावें आणि तें एकत्र केलें जावें ही योजना पात्रांतील धान्याच्या मानानें खर्चाळ, किचकट, आणि डोईजड नाहीं होणार कां?

**उत्तर:** दर महिन्यास नियमितपणें प्रत्येक घरीं कार्यकर्त्याला पोंचण्याचें, संपर्क ठेवण्याचें, आणि विचार-प्रचार करण्याचें पात्र हें फारच छान साधन असल्यामुळें नित्य नियमितपणें संपर्क पात्रवाल्यांशीं राखण्यांत च पात्राचें यश अवलंबून आहे. म्हणून ही योजना किचकट नसून संपर्काचें उत्तम साधन आहे.

धान्य गोळा करण्यांत खर्च काय लागणार? सर्वोदय-मित्र हा मोबदला न घेतां स्वयंसेवक या नात्यानें एवढी सेवा करील. महिन्यांतून एकदां २५ घरीं जाऊन येणें त्याला जड नाहीं.

**प्रश्न:** हें तर सगळें झालें. पण या पात्रांतील धान्याचा विनियोग काय होणार हें नीट समजल्याशिवाय लोक पात्र कसे ठेवतील? आतांपर्यंतच्या

फंडांची आणि निधीची काय वासलात लागली हें पुष्कळांना माहीत आहे. म्हणून आतां लोक अशा योजनेकडे शंकेनें पाहतात.

**उत्तर :** प्रश्न अगदीं बरोबर आहे. या धान्याचा मुख्य विनियोग शांति-सैनिकाच्या निर्वाहासाठीं आहे हें तर आधीं च सांगितलें आहे.

परंतु पात्रांतील धान्यांतून उपाशी लोकांना खाऊ घालणें, रोग्यांना मदत करणें, इत्यादि केवळ भूतदयेचें काम केलें जाऊं नये. त्याच प्रमाणें सडका बांधणें, शाळा बांधणें, इत्यादि ग्राम-विकासाचीं कामें हि त्या धान्यांतून होऊं नयेत. अशीं कामें केलीं पाहिजेत आणि त्यांसाठीं संपत्तिदान इत्यादि मार्गांनीं पैसा हि जमविला पाहिजे. परंतु सर्वोदय-पात्रांतून क्रांतिकारी कार्यक्रम च हातीं घेतला पाहिजे.

जुनीच समाज-रचना कायम ठेवून समाजांतील थोडें दुःख हलकें करणें हा पात्राचा मुळीं च हेतु नाहीं. दुःख हलकें करण्याचें काम हि चांगलें असतें आणि दुःखाचें मूळ कारण नाहींसें न झालें तरी दुःख-निवारणाच्या कामाची गरज असते च. परंतु दुःख-निवारणानें दुःखनिर्मूलन होत नाहीं. समाजांतून रोगाचीं मुळें नष्ट न झालीं तरी दवाखाने चालवावे च लागतात. हें भूतदयेचें काम झालें. परंतु लोकांना उत्तम आरोग्याचें ज्ञान करून देणें, पौष्टिक आहार मिळवून देणें, योगासनें शिकवून आजारी न पडण्याची कला शिकविणें हें क्रांतिकारी कार्य आहे. मजुराच्या वेतनांत पांच-दहा रुपये वाढ मिळवून देणें हें भूतदयेचें काम आहे; मालक-मजूर भेद च नाहींसा करणें हें क्रांतीचें काम आहे.

सर्वोदय-पात्रांच्या द्वारें आम्ही नवीन समाज-रचनेचा विचार पसरवीत असल्यामुळें हें क्रांतीचें कार्य आहे.

**प्रश्न :** खादी-ग्रामोद्योगासारखीं कामें क्रांतीमधें येत नाहींत काय ?

**उत्तर :** जरूर येतील, परंतु तीं ग्रामस्वराज्याच्या तत्त्वावर चालतील तर. एके ठिकाणीं मजुरांना मजुरी मिळवून देण्यासाठीं चरखा किंवा तेलघाणी

चालवायची आणि त्यांतून निघालेली खादी आणि तेल दुसरीकडे जाऊन विकायचें हें व्यापारी काम झालें. परंतु गांवांतली खादी, गांवांतलें तेल, गांवांतच वापरायचें आणि उरलें तर च शहरांत पाठवायचें; या ग्रामस्वराज्याच्या तत्त्वावर चालविले जाणारे ग्रामोद्योग खेड्यांत जरूर क्रांति घडवून आणतील.

**प्रश्न:** सर्वोदय-पात्रांतील धान्याचा विनियोग त्या त्या स्थानांत च करण्याची योजना नाहीं कां करतां येणार ?

**उत्तर:** तालुकेवार, किंवा ग्राम-समूहवार क्षेत्रांचे विभाग पाडून पांच सातशे पात्रांच्या मागें एक शांति-सेवक या प्रमाणें ठिकठिकाणीं सेवक-वर्ग उभा व्हावा आणि त्या पात्रांचा तिथें च विनियोग व्हावा हीच मूळ कल्पना आहे. फक्त सहाव्या हिश्श्याइतकें धान्य अखिल भारत सर्व-सेवा-संघाला जिल्ह्यानें द्यावें असें योजलें आहे. बाकीचे पांच भाग विकेन्द्रित सेवा-कार्यांत च खर्च व्हावे असा प्रयत्न राहील.

**प्रश्न:** शांति-सैनिक कोणती सेवा करील ?

**उत्तर:** अशांतीच्या वेळीं शांतिसैनिक अहिंसेनें शांति तेव्हांच स्थापित करूं शकेल जेव्हां त्याचा त्या क्षेत्रांत सेवेच्या द्वारें घराघरांतून प्रवेश झाला असेल आणि त्याचा नैतिक प्रभाव लोकांवर असेल. यासाठीं प्रत्यक्ष रुग्णसेवा, अडीअडचणींत मदत, करीत असतांना साहित्यप्रचार, सूत्रांजलि, भूदान वाटप, ग्रामदानासाठीं वातावरण तयार करणें, इत्यादि अनेकविध क्रांतिकारी कामें शांतिसैनिक करील. कारण तो आधीं सेवा-सैनिक आहे आणि फक्त अशांतीच्या वेळीं जरूर तर प्राणार्पण करण्यास तयार असलेला शांति-सैनिक आहे.

**प्रश्न:** अनेक कार्यक्रम आले आणि गेले तसा हा सर्वोदय-पात्राचा हि कार्यक्रम पूर ओसरल्याप्रमाणें विरून तर नाहीं जाणार ?

**उत्तर:** कोणती हि चांगली कल्पना पुरुषार्थाशिवाय टिकून राहत नाहीं. क्षणिक उत्साहांत येऊन वारेमाप काम करण्यानें सर्वोदय-पात्रासारखें काम टिकायचें नाहीं. केवळ कागदावर पात्रांची संख्या नोंदविल्यानें हि काम व्हायचें नाहीं.

घरोघर सतत संपर्क राखणें, वारंवार जाऊन विचार समजावणें, आणि पात्रांतील धान्याचा विनियोग क्रांतिकारी सेवाकार्यांत होत असल्याचें दर्शन लोकांना घडविणें, हें पात्रांचें काम स्थिर होण्याचें सूत्र आहे. म्हणून संख्येच्या मागें न लागतां किंवा तात्कालिक मोहीम न समजतां स्थिरपणानें, खोलपणानें, आणि गंभीरपणानें, हा कार्यक्रम हातीं घेण्याची गरज आहे. हा कार्यक्रम यशस्वी झाला तर एका महान शक्तीचें दर्शन होईल.

**प्रश्न :** शांति-सैनिकानें सर्वोदय-पात्रांतील अन्नावर जगणें त्याला लाजिरवाणें वाटणार नाहीं कां ?

**उत्तर :** सर्वोदय-पात्रांतील अन्न हें विशिष्टांचें अन्न नसून सर्व-जनांचें अन्न आहे. विशिष्ट लोकांचें अन्न खाण्यांत त्यांच्या पापपुण्याचा संसर्ग लागतो. म्हणून कार्यकर्त्यानें सर्वसामान्यांचे च अन्न खाणें इष्ट आहे.

सर्वोदय-पात्रांतील धान्य गोळा करण्यासाठीं शांति-सैनिकानें जाण्याची गरज पडूं नये. तें काम सर्वोदय-मित्रानें करावें. शिवाय असें हि करतां येईल कीं पात्रांतील धान्याचा परभारें शांति-सैनिकाशीं संबंध न जोडतां सर्व धान्य एका विशाल महापात्रांत—कार्यालयाच्या किंवा संस्थेच्या रूपांत—जमा व्हावें आणि तेथून शांतिसैनिकांची सोय व्हावी. असें केल्यास शांति-सैनिकाचा सर्व-जन-आधार कायम राहून त्याची मानसिक कुचंबणा टळेल.

**प्रश्न :** शांति-सैनिकाची नियुक्ति कोण करील ?

**उत्तर :** त्या त्या क्षेत्रांत शांति-सैनिक कोण बनूं शकतो तें गांव-कऱ्यांनीं विचार करून ठरवावें. शांति-सैनिकासाठीं जीं पथ्यें आणि अटी सांगितल्या आहेत तीं पथ्यें आणि अटी पाळणारा तो मनुष्य असला पाहिजे. अशा माणसाची शिफारस गांवानें करावी. परंतु शांति-सैनिकाची अंतिम नियुक्ति विनोबाजी स्वतः करतील.

**प्रश्न :** सर्वोदय-पात्र हें सर्वोदय-विचाराला दिलेलें मत आहे आणि शांति-सैनिकाच्या सेवेसाठीं दिलेली संमति आहे असें म्हणतां.

पण सर्वोदय-पात्रांत संमतिदाखल एक चिठ्ठी टाकली तर नाहीं चालणार कां ? धान्य च कां टाकायचें ?

**उत्तर :** चिठ्ठी चालणार नाहीं. कारण सर्वोदय-पात्र म्हणजे मतपेटी नव्हे. संमतीदाखल स्वतः कांहीं झीज सोसण्यास तयार असल्याची खूण म्हणून आपल्या परिश्रमांतील हिस्सा पात्रांत द्यायचा आहे. यालाच ' सक्रिय-संमति-दान ' म्हणतात. दुकानदारानें दुकानांतील धान्याच्या पोत्यांतून पात्रांत धान्य टाकायचें नाहीं. त्यानें केलेल्या प्रामाणिक कमाईतून जें अन्न त्याला प्राप्त होतें त्यांतील एक मूठ पात्रांत टाकायची आहे. " तेन त्यक्तेन भुंजीथाः " समाज-पुरुषाला अर्पण करून मग खायचें, हें वळण सर्वोदय-पात्रांमुळें लागायचें आहे. तें चिठ्ठी टाकल्यानें कसें साध्य होणार ?

**प्रश्न :** सर्वोदय-पात्रांत जो मूठ टाकील त्याला अहिंसेनें जगांत शांति स्थापण्याचा विचार मान्य असला पाहिजे असें आपण म्हणतां. मग सैन्यांतील लोकांना सर्वोदय-पात्र ठेवतां येईल कां ?

**उत्तर :** ठेवतां येईल, जर त्याची अहिंसक समाज-रचनेवर म्हणजे च प्रेम-पंथावर श्रद्धा असेल तर. सैन्यामधें असणाऱ्या अनेक विचारी सेनापतींची श्रद्धा आज हिंसेवरून आणि शस्त्रांवरून ढळली आहे, ढळत आहे. परंतु एक राष्ट्रीय कर्तव्य या भावनेनें ते सैन्यांत आहेत इतकें च. तथापि ज्या माणसाचा विश्वास हातांत बंदूक असून देखील त्या बंदुकीवर नसून प्रेमावर आणि अहिंसेवर असेल तो सैनिक असून देखील आपल्या घरीं सर्वोदय-पात्र ठेवूं शकतो.

सर्वोदय-पात्र ही ठिणगी आहे. अशांतीची आणि विषमतेची रचना हा कचऱ्याचा ढीग आहे. सर्वोदय-विचाराची ठिणगी तो सगळा कचरा भस्म करून टाकील.

**प्रश्न :** शांति-सैनिक पक्षातीत च असला पाहिजे असा आग्रह कां ?

**उत्तर :** ज्याला सर्वांची सेवा करायची आहे त्याला पक्षातीत राहिल्या-शिवाय गत्यंतर नाहीं. सैन्यांतील शिपाई पक्षातीत असले पाहिजेत असा कटाक्ष राखण्यांत येतो. आणि तो बरोबर हि आहे. कारण त्याशिवाय समाजाचें निःपक्षपाती रक्षण होणार नाहीं. हिंसक सेना सुद्धां जिथें पक्षातीत असावी लागते तिथें अहिंसक सेवा-सैनिक तर अवश्य च पक्षातीत असला पाहिजे एवढी साधी गोष्ट कां लक्षांत येऊं नये ?

**प्रश्न :** सर्वोदय-पात्रांत किती दिवस मूठ टाकीत रहायचें ?

**उत्तर :** जोंपर्यंत आपलें भोजन चालू आहे तों-पर्यंत रोज मूठ टाकीत जायची आहे. हा कांहीं एका मुदतीपुरता विचार नसून जीवनाचा विचार आहे.

परिशिष्ट

# वर्धा शहरांतील कामाची माहिती

२८ ऑगस्ट रोजीं वर्धा जिल्ह्यांतील सर्व सर्वोदयप्रेमी मंडळींची एक सभा गोपुरी नालवाडी वर्धा, येथें ग्राम-सेवा-मंडळानें बोलावली होती. त्या सभेंत पू. विनोबांच्या संदेशावर विचार होऊन वर्धा जिल्ह्यांत सर्वांनीं या कार्यास नेटानें लागण्याचा निर्णय झाला.

त्याप्रमाणें ता. १ सप्टेंबरपासून आधी वर्धा शहरांत काम करण्याचें ठरलें. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आणि प्रमुख शहर या ठिकाणीं सर्वोदय-पात्राच्या कामाला वेग आणि आकार मिळाला तर आपोआप त्याचा परिणाम आसपासच्या खेड्यांवर आणि तालुक्याच्या गांवीं होतो असा अनुभव असल्यामुळें हि वर्धा शहर प्रथम हातीं घेतलें.


सर्वोदय-पात्राचें काम दर महिन्यास संबंधित घरांपर्यंत पोंचण्याचें आणि संपर्काचें असल्यामुळें व्यक्तिगत परिचयाच्या आधारावर विचार समजावून देऊन तें करावें असा मंडळींचा अभिप्राय पडला. त्याप्रमाणें रोज ४-५ तास दुपारच्या वेळीं भगिनी वर्गांतून ४-५ जणी घरोघर जाऊन मंदिरांतून, पुराण कीर्तनें इत्यादींच्या बैठकांत हजर राहून, सर्वोदय-पात्राचा विचार समजावून देऊं लागल्या. ज्या मंडळींकडून आश्वासनें मिळतील त्यांचीं नांवे व्यवस्थित रीतीनें नोंदवून घेण्यासाठीं २५ पृष्ठांची नोंदबुकें छापून घेतलीं आणि प्रचारकांजवळ देण्यांत आलीं. वर्ध्याच्या परिसरांत संस्था हि बऱ्याच असल्यामुळें त्यांची मदत पात्राच्या प्रचारांत झाली. शहरांतील स्थानिक ४-५ भगिनी देखील या कामाला मिळाल्या.

अनुक्रमांक २/१७२ वि: निबंध
क्रमांक ९२९६ नों: दि: १५।५।५९

ता. २ ऑक्टोबरपर्यंत पुढीलप्रमाणें काम झालें—

| | | | |
|---|---|---|---|
| सेवाग्राम आश्रम | १ | ग्राम-सेवा-मंडळ | |
| तालीमी संघ परिवार | ३२ | सरंजाम कार्यालय | ५१ |
| कस्तूरबा दवाखाना | ११ | महिलाश्रम परिवार | १७ |
| परंधाम आश्रम | ३ | ,, छात्रावास | १५ |
| दत्तपूर कुष्ठधाम | ४८ | काकावाडी (गांधीनिधि) | ९ |
| नालवाडी कार्यालय | २५ | वर्धा शहर | ४९० |
| गो-सेवा चर्मालय | २९ | खेडेविभाग | २७३ |
| ग्राम-सेवा मंडळ | २६ | एकूण पात्रसंख्या | १०३० |

**सूत्रदान आणि सर्वोदय-महापात्र समर्पण-विधि**



२ ऑक्टोबर रोजीं गांधी चौकांत सूत्रदानाच्या जाहीर कार्यक्रमाबरोबर सर्वोदय-पात्रांतील धान्य अर्पण करण्याचा जाहीर कार्यक्रम झाला. संस्थांनीं आपापलें धान्य आणलें होतें. शहरांतील घरांतून लहान मुलें आपापलीं पात्रें घेऊन आलीं आणि 'महापात्रां' त तें धान्य त्यांनीं अर्पण केलें. त्या दिवशीं

एकूण १२२ शेर धान्य आणि रु. ४१.८० नये पैसे जमा झाले. साधारणपणें ६२५ पात्रांतून एवढें जमा झालें. खेडेविभागांतून धान्य जमा करून आणणें जमलें नाहीं. वरील धान्य पांच व्यापाऱ्यांना दाखवून त्याची विक्री करण्यांत आली. त्याचे रु. ४७.३८ नये पैसे आले. चालू भावांत हें धान्य विकलें गेलें.

मंडळींना आपापलें धान्य महिन्याच्या शेवटीं नेऊन टाकणें सोईचें जावें म्हणून शहरांत तीन ठिकाणीं गॅलवनाईज ड्रमचीं महापात्रें ठेवण्यांत आलीं आहेत. गव्हासाठीं, ज्वारीसाठीं, आणि तांदुळासाठीं वेगवेगळीं पात्रें ठेवलीं आहेत. पैशासाठीं लाकडी मोठी पेटी ठेवली आहे. महापात्रांच्या जागीं रजिस्टर ठेवण्यांत आलें आहे. पात्रांतील धान्य टाकणारे आपापलें नांव नोंदवून मग धान्य टाकतात. प्रत्येकाला त्याबद्दल पावती देण्याची पद्धति नोव्हेंबर पासून सुरू केली आहे.

महिन्याचे पहिले १५ दिवस जुन्या पात्रांची देखरेख, पात्रांतील धान्य गोळा झालें नसेल तर तें गोळा करणें, सर्वोदय-मित्र नेमणें, इत्यादि कामांत द्यायचे आणि पुढील १५ दिवस नवीन पात्रांच्या स्थापनेचा प्रयत्न करायचा असें धोरण आहे.

घरीं पात्र न ठेवतां महिन्याच्या शेवटीं अंदाजी धान्य किंवा ५ आणे देऊन टाकण्याची प्रवृत्ति बऱ्याच ठिकाणीं आढळली. परंतु पात्र ठेवून मुलाकरवी नियमित मूठ टाकण्यांतील महत्त्व पटवून देण्यावर विशेष जोर देण्यांत आला पाहिजे. उत्साहाच्या भरांत पात्रें सुरू तर होतात परंतु तीं टिकलीं नाहींत तर सर्वोदय-पात्राच्या महान सुप्त शक्तीचें दर्शन होणार नाहीं. म्हणून सातत्य, नित्य संपर्क, आणि विचार-प्रचार, यांच्या द्वारे कार्यकर्त्यांना सतत जागरूकता राखावी लागणार आहे.

नोंदबुकाचा नमुना, पावती बुकाचा नमुना, आणि पात्रावर लावण्याच्या लेबलचा नमुना यासोबत जोडला आहे.

मराठा ग्रंथ ... म. ठाणें. स्थळ
अनुक्रम 21782 वि: ...
7256 नों. दि. ...



वर्धा जिल्हा ३ तालुक्यांचा आणि ६।। लाख लोकवस्तीचा लहान जिल्हा आहे. खेडे विभागांतून १५ नोव्हेंबरपासून विशेष प्रचार करण्यांत येणार आहे. विनोबांची या जिल्ह्याकडून अपेक्षा त्यांच्या संदेशांत व्यक्त झाली च आहे.

## सर्वोदय-पात्राचें श्लोकबद्ध मर्म
### (अनुष्टुभ् छंद)

दीक्षा सर्वोदयाची ही शांतीसाठीं च जीवन
आधीं जन-हिता साधूं जपूं जय-जगत् सदा ।।

विश्व-मानुष प्रेमाचें बाळा वळण दैनिक
पाया नव-समाजाचा सत्य-कारुण्य-साधना ।।

## सर्वोदय-पात्रावर लावण्याची चिठ्ठी

उद्देश सर्वोदय-पात्र

१. सर्वोदय-विचार आणि अहिंसक शांति-सेना यांस संमति,

२. समाज-पुरुषाच्या ऋणाचें स्मरण,

३. बालकाला शुभ संस्काराचें दैनिक वळण.

स्थापना दिन ······ अनुक्रम ······

---

टीप :- १. आपल्या घरीं पवित्र जागीं एक पात्र ठेवावें.

२. घरच्या लहान बालकाच्या हातून रोज एक मूठ धान्य या पात्रांत टाकावें. रोज एकच प्रकारचें धान्य टाकावें. पीठ टाकूं नये.

३. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत आपल्या पात्रांतील धान्य नियोजित जागीं ठेवलेल्या 'महापात्रां'त नेऊन द्यावें.

## वर्धा-जिल्हा सर्वोदय-पात्र (नोंद बुक)

नांव·······································

गांव·······································

पत्ता·························वॉर्ड नं.·········

धान्य/नया पैसा

स्थापना-दिन·················

नोंदणाराची सही

## वर्धा-जिल्हा सर्वोदय-पात्र (पावती बुक)

नांव·······································

गांव·······································

पत्ता·······································

धान्य :- शेर·····तोळे·····

नये पैसे ·········

मिळाल्याचा दिनांक संग्राहकाची सही

महालय ठाणे
eco3
REFBK-0009803

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम विद्यापीठ
पो. पवनार, जि. वर्धा.

किंमत १५ न. पै.

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम मुद्रणालय, परंधाम विद्यापीठ,
पवनार, जि. वर्धा.